# प्रकरण तिसरे

# “व्यक्ति आणि वल्ली” मधील व्यक्तिचित्रणाचे विशेष

## – प्रकरण तिसरे –

## – "व्यक्ति आणि वल्ली" मधील व्यक्तिचित्रणाचे विशेष –

---

विनोदी लेख, एकांकिका, नाटक, प्रवासवर्णन, कादंबरी इत्यादी वाड्.मय प्रकार यशस्वी रीतीने हाताळीत असतानाच पु.लं.नी व्यक्तिचित्रणाकडेही तितक्याच आस्थेने लक्ष पुरविले आणि काही काल्पनिक, काही खऱ्या व्यक्तिरेखा चितारून या लेखन प्रकाराचे दालन समृद्ध केले.

लघुनिबंध, प्रवासवर्णन यांच्या प्रमाणेच हा लेखनप्रकारही कलात्मक प्रकार म्हणून साहित्यांत स्थिरावला आहे. इंग्रजी साहित्यांत व्हिक्टोरिया राणीचे चरित्र लिहिणारा लिटन स्ट्रेंची किंवा स्कॉटचे चरित्र प्रसिद्धीस आलेला लॉकहार्ट यांच्या चरित्र लेखनाकडे ओझरता दृष्टीक्षेप टाकला तरी त्यांतील मांडणीची जाणीव झाल्यावाचून राहत नाही. कलामूल्यांची जाणीव बाळगून हा लेखनप्रकार हाताळणारे लेखक जसजसे अधिक प्रमाणात पाश्चात्य देशात उदयास येऊ लागले तसतसे या लेखन प्रकाराची चिकित्सा करणारे टीकावाड्.मय ही त्या देशात वाढत्या प्रमाणावर निपजू लागले.

लॉर्ड डेव्हिड सेसिल, आंद्रे मोर्वा, एलिझाबेथ, डयू हेरॉल्ड निकोलस इत्यादि टीकाकारांनी या वाड्.मय प्रकारासंबंधी आजवर पुष्कळच चर्चा केली. मराठीतही गेल्या काही वर्षापासून या वाड्.मय प्रकाराकडे लेखक लक्ष पुरवीत आले आहेत. कुमार रघुवीर (हृदय), वि.द. घाटे (काही म्हातारे व एक म्हातारी; पांढरे केस हिरवी मने), प्रा.श्री.म.माटे (पाश्चात्य पुरूषश्रेष्ठ), रा.चि. ढेरे (इंद्रायणी),वि.स. खांडेकर (गोकर्णीची फुले) वगैरे लेखकांच्या पुस्तकांचा वानगीदाखल निर्देश करता येईल. याशिवाय आणखी किती तरी ग्रंथकारांची नांवे सांगता येतील. व्यक्तींची चरित्रे काय किंवा शब्दचित्र काय, हा लेखन प्रकार कलात्मक दृष्टया हाताळण्याचा अलीकडील काही पाश्चात्य लेखकांनी पायंडा पाडण्यास जशी सुरूवात केली आहे तशाच मराठी वाड्.मयातही नव्या दृष्टीकोणांतून असल्या प्रकारच्या स्वभावछटांना प्राधान्य देणाऱ्या व्यक्तिरेखा रंगविल्या जाऊ लागल्या

आहेत.

पु.लं.नी 'व्यक्ति आणि वल्ली' आणि 'गणगोत' या दोन ग्रंथात समाविष्ट केलेल्या व्यक्तिरेखा आजपर्यंत मराठीत प्रकाशित झालेल्या व्यक्तिचित्रणांहून सर्वस्वी वेगळया नसल्या तरी गुणवत्तेच्या दृष्टीने सर्वात सरस आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

**व्यक्ति आणि वल्ली :–**

'व्यक्ति आणि वल्ली' ची पहिली आवृत्ती 1962 साली प्रसिद्ध झाली. त्यानंतर पुन्हा दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून एकंदर वीस हजारांहून अधिक प्रति आतापर्यंत खपल्या असल्याचे जाहीर केले आहे. पुस्तकाच्या खपाचा त्याच्या अंगभूत गुणाशी मेळ घालणे धोक्याचे असले तरी सद्भिरूचीची चाड असलेल्या लेखकांच्या ग्रंथाच्या बाबतीत हा हिशेब अंगलट येईल असे मला वाटत नाही. वाचकांनी पु.लं.च्या प्रस्तुत पुस्तकाला भरघोस प्रमाणात प्रतिसाद दिला तो काही प्रकाशकाच्या क्लृप्तीमुळे, जाहिरातबाजीमुळे किंवा अन्य कोणत्याही बाह्य कारणामुळे नव्हे; पुस्तकातील वाङ्मयीन गुणांचा निर्वाळा त्यांना मनोमन पटला म्हणूनच त्यांनी इतक्या मोठया प्रमाणावर या पुस्तकाचे स्वागत केले हे कुणाला नाकारता येईल?

सुमारे वीस वर्षापूर्वी पु.लं.नी अभिरूची मासिकातून टोपण नावाने विनोदी लेख व एकांकिका लिहावयास सुरूवात केली त्याच वेळी अधून मधून ते छोटी छोटी व्यक्तिचित्रणही प्रसिद्ध करू लागले. 'भय्या नागपूरकर', 'अण्णा वडगांवकर' वगैरे व्यक्तिरेखा त्याचवेळी प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'पृथ्वी गोल आहे', 'नाटक कसे बसवतात', 'आणखी एकच प्याला', 'आठवणी -- साहित्यिक आणि प्रामाणिक', 'माझी पाठ धरते' वगैरे लेखांनी अन् एकांकिकांनी पु.लं.च्या विनोदबुद्धीचा आगळेपणा जसा वाचकांच्या चित्तावर ठसविला तसा वरील व्यक्तिचित्रणांनीही आपल्या वैशिष्टयपूर्ण शैलीची त्यांच्यावर छाप पाडली.

या व्यक्तिचित्रात पु.लं.च्या विनोदबुद्धीचा त्यांना आढळ तर होत होताच. याशिवाय वर्ण्य व्यक्तीकडे पाहण्याचा त्यांचा जिव्हाळयाचा दृष्टीकोण मानवी स्वभावातील विविधता अन् वैचित्र्य याचे दर्शन घडविणारी त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, वर्णन शैलीतील मार्मिकता वगैरे गुणांचाही सुखद प्रत्यय येत होता.

'व्यक्ति आणि वल्ली'त एकूण वीस लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. ही सारी व्यक्तिचित्रे असली तरी असंभाव्य कोटीतील नाहीत. वास्तवतेचा त्यांना आधार आहे. म्हणूनच प्रस्तुत पुस्तकाला जोडलेल्या छोटयाशा प्रास्ताविकांत पु.लं.नी "ह्या व्यक्ति आणि वल्ली म्हटल्या तर भेटल्या आहेत, म्हटल्या तर नाहीत"(1) असा मार्मिक खुलासा केला आहे. ललित वाङ्मयात असल्या प्रकारचे प्रश्न संभवू नयेत असेही त्यांनी या संदर्भात म्हटलं आहे, त्यात फार मोठा अर्थ भरला आहे.

ललित वाङ्मयात भिन्नभिन्न प्रकृतीच्या व्यक्तिरेखा जेव्हा लेखक निर्माण करतो तेव्हा त्या खऱ्या की खोटया असा प्रश्न अप्रस्तुतपणाचे ठरणार आहे. लेखकाने रेखाटलेल्या व्यक्तिचित्रात त्याच्या खऱ्या खुऱ्या अनुभूतीचे रंग मिसळले आहेत किंवा नाहीत असा प्रश्न विचारणे औचित्याला धरून होईल. कल्पना आणि वास्तव यांच्या संमिश्र रंगछटा वापरून ललित लेखक आपल्या मानसपुत्राचा अगर कन्यांच्या प्रतिमा चितारीत असतात हा मुद्दा ध्यानात घेऊन पु.लं.च्या 'व्यक्ति आणि वल्लीं'तली चित्रणे पाहू लागलो म्हणजे ती अवास्तव तर वाटतच नाहीत, उलट अशी माणसे आपणांलाही कधी तरी कुठे तरी भेटल्यासारखी वाटतात खरी. असे आपले मन आपणांलाही ग्वाही देऊ लागते.

संपूर्ण संग्रहातून पु.ल. देशपांडे या व्यक्तीचे तिच्या नाटय, चित्र, संगीतातील रसिकत्वाचे चित्रण आढळते. असे असून संग्रहातील व्यक्ती स्वतंत्र आहेत. त्यांच्यावर लेखकाचे बंधन नाही.

'व्यक्ति आणि वल्ली'चा सर्वात प्रमुख विशेष म्हणजे प्रत्येक व्यक्ति व क्षेत्राचे, भोवतालच्या परिस्थितीचे पु.लं.नी केलेले अत्यंत सूक्ष्म निरीक्षण व चित्रण या संग्रहातील प्रत्येक व्यक्तिचित्र या विशेषणाचा प्रत्यय देणारे आहे. संग्रहाच्या नावाप्रमाणेच यातील व्यक्तिमध्ये एक एक वल्ली दडली आहे. कोणत्याही व्यक्तिचित्रात पु.ल. व्यक्तीच्या चेहऱ्याचे वर्णन न करता इतर पोशाख, बोलणे, चालणे, लकबी, सवयींचे वर्णन करतात आणि व्यक्तीच्या अंतर्मनाचा वेध घेतात. कारण त्यांना व्यक्तीपेक्षा तीमधील प्रवृत्ती दाखवायची आहे. त्यामुळे बहुतेक व्यक्तिचित्रे हे प्रातिनिधिक स्वरूपाचे नमुने सादर करतात.

व्यक्तिचित्र लेखनातील आत्यंतिक सहजता हे या संग्रहाचे महत्वाचे वैशिष्टय आहे. विनोद, कारूण्य, एखादे मत प्रदर्शन काहीही असले तरी त्यात कुठेही कृत्रिमता, ओढाताण नाही. मात्र गंपू, बापू, नारायण, चितळे मास्तर या व्यवितचित्राच्या वेशभूषेत मात्र साम्य जाणवते. मात्र वातावरण, काळ-वेळ यानुसार बदलणारी व अत्यंत परिणाम साधणारी भाषा हा 'व्यक्ति आणि वल्ली'ने दिलेला मराठी वाङ्मयाचा एक अलंकार म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

अवती भवतीच्या जगात पु.लं.ना ज्या ज्या व्यक्तीत काही विशेष गुण आढळला, काही अविस्मरणीय स्वभावधर्म दिसून आला हे नमुने निरनिराळया थरांतले आहेत तसे निरनिराळया क्षेत्रातले आहेत. प्रत्येकाच्या आवडी निवडी वेगवेगळया तसे त्यांच्यावर झालेले संस्कारही वेगवेगळया प्रकारचे. कलावंत, साहित्यिक, समाजसेवक, शिक्षक, परीट अशी भिन्न भिन्न कार्यक्षेत्रातली माणसे तुम्हाला इथे सापडतील, तशी कसलाच व्यवसाय अगर छंद नसलेली – अंतू बर्व्यासारखी प्रापंचिक माणसेही असढळून येतील. भाबडा नारायण आणि इरसाल बबडू, ध्येयनिष्ठ हरितात्या अन् कसलेच ध्येय नसलेला गजा खोत अशी विविध प्रवृत्तीची, विविध गुणांची माणसे इथ एकत्र आली आहेत.

स्वभावाने, गुणाने अथवा व्यवसायाने या साऱ्या व्यक्ती वेगवेगळया वाटल्या तरी त्या सर्वात एक समानधर्म वास करीत असतो. सुशिक्षित – अशिक्षित, ब्राह्मण--अब्राह्मण, उद्योगी--निरूद्योगी अशी सर्व प्रकारची ही मंडळी माणुसकीची चाड बाळगून आहेत. मानवतेच्या मूल्यांचा उच्चार न करता किंवा त्यावर भाष्य न करताही त्या मूल्यांना जपणारी, त्यांचा आदर करणारी ही मंडळी आहेत. शब्दापेक्षा कृतीतून माणुसकीचा आविष्कार करणे त्यांना अधिक जमते. म्हणूनच त्यांच्या भाबडेपणाचे बोलण्याचालण्यातल्या विसंगतीचे, फाजील उत्साहाचे, आगाऊपणाचे आपणाला हसू येत असले तरी त्यांच्यातली माणूसकी लक्षात आल्यावर त्यांच्यापुढे आदराने मस्तक लववावेसे वाटते. पु.लं.नीच प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे त्यांना मिठी माराविशी वाटते.

प्रस्तुत संग्रहातले पहिलेच व्यक्तिचित्रण सगळया गावाच्या हरघडी आपण उपयोगी पडावे, कुणी बोलावो न बोलावो तिथे धावत जाऊन पडेल ते काम करावे अशी मनापासून इच्छा बाळगणाऱ्या नारायणाचे हे शब्दचित्र आहे. दुसऱ्यासाठी झिजण्यात नारायणाचा निरपेक्ष सेवाबुद्धीशिवाय

दुसरा कसलाही हेतू नसतो. नारायणाच्या कामसूपणाची अन् सेवावृत्तीची कल्पना आणून देताना लेखकाने त्याच्या स्वभावाचे आणखी किती तरी पदर उलगडून दाखविले आहेत. तो नुसताच कष्टाळू नसतो. त्याच्या स्वभावात मिष्किलपणा आणि भाबडेपणा याचे चमत्कारिक मिश्रण झालेले असते. तो काहीसा फटकळही असतो. कुणाच्याही इथे मंगलकार्य निघो साखरपुडयापासून वराती पर्यंत सारे काही यथासांगपणे निभावून नेण्याची जिम्मेदारी जणू आपणावरच सोपविली आहे. अशा श्रद्धेने तो लग्नमंडपात वावरत असतो. लग्नासाठी लागणाऱ्या मोत्यांच्या कुडयापासून तो उदबत्तीच्या पुडयापर्यंत साऱ्या जिनसांची यादी त्याला मुखोद्‌गत असते. एवढेच नव्हे तर कोणता जिन्नस कुठल्या दुकानात किफायतशीर भावात अन् चांगल्यापैकी मिळतो याचीही त्याला खडान् खडा माहिती असते. त्याला इंग्रजी बेताचेच येते. तरीपण प्रसंगविशेषी तो त्या भाषेतून मनातले बोलून दाखवायला कचरत नाही! त्याची मामेबहीण लग्न झाल्यानंतर पहिल्यांदाच सासरी जायला निघते तेव्हा त्याला हुंदका आवरत नाही. नाकावर उतरलेला चष्मा वर करण्याचे निमित्त करून तो डोळे पुसतो आणि 'सुमे मजेत रहा बरं!' असे नवऱ्यामुलीला सांगतो. तिचे सारे बाळपण त्याच्या दृष्टीसमोर तरळू लागते. मनातले कढ अनावर होऊन तो काहीतरी बोलायचे म्हणून कुणाला तरी म्हणतो, ''आय ॲम द नोइंग हर चाइल्डहुड!' नारायणाच्या मोडक्या तोडक्या इंग्रजीचे कुणाला हसू येत नाही. कारण त्याचे इंग्रजी अशुद्ध असले तरी त्यामागचा भाव शुद्ध आहे याची सर्वांनाच खात्री पटलेली असते. 'मुलगा अगर मुलगी सरळ वळणाची अगर सरळ वळणाचा कसा असतो कोण जाणे! कारण 'वळण' म्हटल्यावर ते सरळ कसे असणार? भूमितीला बुचकळयात ढकलणारी ही सरळ वळणाची आडवळणी व्याख्या आहे. ही पु.लं.च्या विनोदी ढंगाची पद्धत आपणांस पहावयास मिळते.

अशी ही नारायणाची भाबडी, कष्टाळू, सरळ मनाची व्यक्तिरेखा उभी करून पु.लं.नी व्यक्तिचित्राचा उत्कृष्ट नमुना वाचकांसमोर ठेवला आहे.

'हरितात्या' ही या संग्रहातली दुसरी व्यक्तिरेखा. इतिहासाशी संपूर्ण समरस झालेल्या, मनाने सदैव भूतकाळात वावरणाऱ्या, शिवबा, रामदास, जनकोजी शिंदे, शेलारमामा, तानाजी यांच्या गोष्टी लहान मुलांना सांगून त्यांचे आदर्श कोवळया मनावर ठसविणाऱ्या एका ध्येयवेडया म्हाताऱ्याचे

हे शब्दचित्र आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या प्रत्येक पिढीत अशी ध्येयवेडी माणसे फार मोठया प्रमाणावर निपजत होती. कुणाला स्वातंत्र्याचे, कुणाला स्वदेशीचे, कुणाला ज्ञानप्रसाराचे, कुणाला इतिहासाचे तर कुणाला भक्तीचे असे एकेक वेड घेऊन ही माणसे जगत होती. ह्या वेडापायी त्यांनी दारिद्र्याची तमा बाळगली नाही. हालअपेष्टांची पर्वा केली नाही की मानापानाची भिती बाळगली नाही. ह्यांच्या अंगावरले कपडे मळखाऊ होते पण मने स्वच्छ होती. गरिबीमुळे मीठ भाकरी शिवाय अन्य पदार्थ त्यांच्या ताटात कधी पडला नाही. पण वाणीत नेहमी अमृत भरलेले असायचे! पोटासाठी हरितात्यांना घरोघर जाऊन छत्र्या विकाव्या लागल्या, कधी उदबत्त्यांचे पुडे विकावे लागले. तेवढया व्यवहारापुरतेच ते वर्तमानात असत बाकी इतर वेळी ते भूतकाळातच वावरत.

इतिहासाची आवड असणाऱ्या व्यक्तीची आजवर खूपजणांनी टर उडविली आहे. त्यांच्या नादिष्टपणाचे विनोदाच्या नावाखाली हसे करून सोडले आहे. पण ह्या 'तमाम इनोदी मंडळींना' इतिहासाचे वेड घेऊन जन्माला येणाऱ्याचा ध्येयवाद कधीच उमगला नाही. त्यांचा अंतरात्मा त्यांना 'गावला' नाही.

हरितात्यांचे शब्दचित्र वाचतानासुद्धा आपण हसतो पण ते त्यांच्या ध्येयवादाला किंवा छंदीष्टपणाला नाही.शाहिस्तेखानाची बोटे कापली गेल्यावर तो दिल्लीला पळून गेल्याची गोष्ट ते मुलांना सांगतात तेव्हा ते त्याला उद्देशून एक इरसाल शिवी देतात. त्या शिवीतला जहालपणा वाचकांच्या लक्षात आणून द्यायच्या उद्देशाने पु.ल. म्हणतात, "... इथे शाहिस्तेखानाला अशी कडकडून शिवी गेली की ती त्याने ऐकली असती तर दुसरा हात हरितात्यांच्या पुढे करून सांगितले असते ह्याही हातांची बोटे कापा हवी तर पण असली शिवी नका देऊ!"

अशासारख्या गोष्टीचे या लेखात आपणाला हसू येते. हरितात्यांच्या गोष्टी ऐकणाऱ्या मुलात बाबू फडणीस म्हणून एक वेंधळा मुलगा असतो. गोष्ट ऐकताना 'महाराज कोण?' अशा सारखा मध्येच निर्बुद्धपणाचा प्रश्न तो करतो तेव्हा त्याच्या या वेडेपणाचे आपणाला हसू येत!

सारांश, काही नाटककारांनी किंवा कथालेखकांनी इतिहासकारांना अन् इतिहास संशोधकांना अर्धवटांच्या कोटीत ढकलून त्यांची निष्ठा हास्यास्पद करून सोडण्याचा अन् आपल्या उथळ

विनोद बुद्धीचे प्रदर्शन करण्याचा बालीश प्रयत्न केला तसला मोह हरितात्यांचे वर्णन करताना पु.लं.नी होऊ दिला नाही.

इतिहासकारांतली वैगुण्य दाखवू नयेत किंवा त्याचा कुणी उपहास करू नये. वैगुण्य, व्यंग यांच्यावर उपरोधाचे शरसंधान करायचा कुणाही विनोदी लेखकाला अधिकार पोहोचतो. पण 'इतिहासावरले प्रेम' याच गोष्टीची उठसूट टर उडवू पाहणे हे कोत्या बुद्धीचे लक्षण आहे असे म्हणावेसे वाटते. गाण्यातल्या रसाचा लहान मुलांना आस्वाद घेता येत नाही, अशावेळी ती गायकाच्या हातवाऱ्यांची किंवा चेहऱ्यावरल्या हावभावाची नक्कल करून स्वतःची करमणूक करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांच्या वयाला अन् बुद्धीला साजेसाच त्यांचा तो अवखळपणा असतो. पण प्रौढांनीही नेणतेपणात खपून जाणाऱ्या या गोष्टी करण्याचा हव्यास बाळगावा हा शुद्ध पोरकटपणा नाही तर काय?

स्वतःच्या ऐतिहासिक घराण्याचा अभिमान वाहणाऱ्या पण कृतीत त्या अभिमानाचा एक शतांशही न आणणाऱ्यांची पु.लं.नीही एका प्रहसनांत रेवडी उडविली आहे. 'आमचे पूर्वज' ही छोटीशी एकांकिका वाचून पाहिल्यास लक्षात येईल. त्या एकांकिकेत त्यांनी ऐतिहासिक घराण्याचा पोकळ अभिमानाची थट्टा केली आहे. ज्या पूर्वजांबद्दल अभिमान वाहायचा तेही कित्येक वेळा सामान्य पातळीवरचेच असतात. केवळ भूतकाळात तेही कित्येकवेळा सामान्य पातळीवरचेच असतात, केवळ भूतकाळात त्यांची कारकीर्द जमा झाल्यामुळे त्यांचे वंशज त्यांना मोठेपणा चिकटवीत असतात. या वस्तुस्थितीचा त्यांनी मजेदार उपहास केला आहे.

**पु.ल. आणि विडंबन :-**

विडंबन कशाचे करायचे, उपरोधाचे हत्यार कशावर चालवायचे याचे काही संकेत ठरलेले आहेत. निदान समंजस साहित्यिक हे दंडक कसोशीने पाळीत असलेले दिसून येतात. एखाद्या गोष्टीचे विडंबन किंवा उपहास करताना पु.लं. या संकेताचे विस्मरण होऊ देत नाहीत. म्हणून त्यांच्या विनोदबुद्धीबद्दल आदर वाटू लागतो. हरितात्यांना हास्यास्पद करून सोडणे एरव्ही त्यांना काही अवघड नव्हते. इतिहासाविषयी त्यांचे वेड अन् वृत्तीतला काहीसा भोळसटपणा एवढया भांडवलावर त्याचे हसे करायला कुणीही वेळ लावला नसता. पण पु.लं.नी त्यांना हास्यास्पद तर

बनविले नाहीच उलट त्यांच्या आभाळा एवढया विशाल व्यक्तिमत्वाचा त्यांनी वाचकांच्या मनावर अमिट ठसा उमटविला आहे.

हरितात्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्व डोळयापुढे उभे केल्यावर पु.लं.नी त्या लेखाचा समारोप कसा हृदयस्पर्शी केला आहे तो पाहण्यासारखा आहे. ते लिहितात –(2)

"आमचे बाळपण इतिहासजमा झाले. घरातली कर्ती माणसे दृष्ट लागून जावी तशी गेली. अंगणातलं खळं सारवायचा त्रास होतो म्हणून फरशी घातली. तिथली चिमुकली फुलबाग गेली. आजोबा गेले आजी गेली. वडील गेले – घरचे नात्यागोत्याचे पै पाहुणे परके झाले... हरितात्या कुठे गेले कोण चौकशी करणार? कधी कधी पाठीला डोळे फुटतात त्यांत काचांच्या फुटक्या तुकडयांत खूप प्रतिबिंबे लखलखावी तशी जिव्हाळयाची दिवंगत माणसे दिसायला लागतात. जीव एवढा एवढासा होतो. एखादा उदबत्तीचा वास, एखाद्या नव्या कोऱ्या छत्रीवर पडलेल पावसाचं पाणी – मनाला मागे घेऊन जातं – हरितात्यांचा आवाज घुमायला लागतो. ह्या देवाघरच्या माणसाने आम्हांला खूप दिलं. सदैव इतिहासाचे पंख लावलेला हा वेडाबापडा माणूस एवढया एवढया हलक्या पोरांना घेऊन उडत उडत जाई. खरे खोटे देव जाणे पण क्षत्रिय कुलावतंस छत्रपतींचे समर्थाचे दर्शन घडवी. हरितात्यांनी आनंदवन भुवनाची कथा सांगताना "बुडाला औरंग्या पापी" म्हणून एवढयाने आरोळी मारली होती की, आमच्या घरातली पाच पंधरा मंडळी अंगणात धावत आली होती. आमच्या चिमुकल्या जीवनाच्या हरळीच्या मुळया त्यांनी भूतकाळात नेऊन रूजविल्या. हरितात्यांनी कधी पैशाचा खाऊ दिला नाही पण प्रचंड अभिमान दिला. चिमुकल्या मनगटात कसल्या तरी जोमाच्या मनगटया घातल्या. त्यावेळी दिसल्या नाहीत त्या त्यांच्या अदृश्य वळया. आज एखाद्या आघाताच्या क्षणी दिसायला लागतात. दुर्दैवाने दर वेळी मुठी वळाव्या तशा वळतातच असे नाही पण वेळ प्रसंगी वळू शकतील असा कुठेतरी आत्मविश्वास अजून लपलेला आहे आणि हरितात्यांनी हे सारे न मागता दिले."

भाषा विलासाच्या दृष्टीने हा उतारा अपूर्व तर आहेच पण त्यातली लेखकाची व्यथा, हरितात्यांविषयीचा जिव्हाळा व्यक्त करताना आलेला गहिंवर अधिक हृद्य आहे असे वाटते.

मनापासून एखादी भावना अगर विचार प्रगट करायचा झाला तर लेखकाच्या अभिव्यक्तीला आपोआपच शैलीची कला येते, तिच्यात लय येते, ताल येतो.

**'नामू परीट'** ही शब्दचित्रासाठी पु.लं.नी निवडलेली तिसरी व्यक्ति किंवा वल्ली. दुसऱ्याचे कपडे धुवायला आणल्यावर स्वतःच काही दिवस वापरण्यात त्याला काहीच दिक्कत वाटत नाही. प्रत्येक प्रश्नाला तो जितकी स्वच्छ उत्तरे देतो तितके स्वच्छ कपडे त्याने कधी धुतले नसतील. त्याने इस्त्री केलेल्या कपडयांना जितक्या सुरकुत्या असतात तशा चेहऱ्यावर न पाडता तो वाटेल त्या अवघड प्रसंगांना तोंड देत असे.

चोरीची सायकल खरीदल्याचे सांगताना तो कचरत नाही, अमुक ठिकाणच्या हातभट्टीची आपणही झोकत असतो हे राजरोपणे कबूल करताना त्याच्या चर्येवर शरमिंधेपणाचा भाव उमटत नाही – असा हा निःसंग, बेडर मनाचा नामू परीट वाचकांसमोर उभा करताना पु.लं.नी त्याच्या व्यक्तित्वाचे काही विलोभनीय विशेषही जिव्हाळयाने टिपले आहेत. "सदैव कपडयांच्या जगात वावरणारा इतका नागवा माणूस माझ्या पाहण्यात नाही." असे नामूबद्दलचे आपले मत जाहीर करता करताच ते त्याच्यातल्या माणुसकीचे कणही कौशल्याने टिपतात.

**'बबडू'**चा नमुनाही जवळ--जवळ याच जातीचा. नामूचा स्वभाव इरसाल खरा पण त्याचा धंदा तरी शहाजोगपणाचा असतो. पण 'बबडू'च्या मनाची ठेवण जशी बेछूट तसा त्याचा धंदाही फटिंगपणाला साजेसा! खिसे कापण्याच्या अन् हातभट्टीच्या धंद्यावर गबर होण्यात त्याला कसलीच तमा वाटत नाही.

पण काळयाकभिन्न कातळातही कुठेतरी ओलावा पाझरत असावा असा त्याच्या वृत्तीत चांगुलपणाचा बारीक पाझर झिरपत असतो! कृतज्ञता, भूतदया, श्रद्धा! इत्यादी गुणांना तो पारखा झालेला नसतो. त्याच्याबद्दल वाचकांच्या मनात सहानुभूतिच नव्हे तर आदराची भावनाही निर्माण करतात.

**'सखाराम गटणे'** म्हणजे नामू परीट किंवा बबडू बत्तीवाला याच्या अगदी उलट टोकाला गेलेली व्यक्ती! वयाची विशी न ओलांडलेला हा पोरसवदा तरूण कमालीचा पापभीरू, विनयशील आणि आज्ञाधारक वृत्तीचा असतो. मोठयाचे अनुकरण करण्याचा, त्यांचा उपदेश शिरोधार्य मानण्याचा त्यांचा एकमेव आवडता छंद असतो. जीवन म्हणजे एखाद्या स्वच्छंदपणे धावणाऱ्या झऱ्यासारखे असे

त्याला वाटतच नाही. ते एखाद्या बंदिस्त नीटनेटक्या पुठ्ठयाचे कव्हर घातलेल्या छापील ग्रंथासारखे आहे. अशी का कुणास ठाऊक त्याने आपल्या मनाची धारणा करून घेतली होती.

पु.ल. म्हणतात गटण्याच्या मनगटाला चिमटा घेतला तर त्यातून रक्ताऐवजी शाईच बाहेर येईल असे वाटण्याइतकी त्याच्या जगण्याला छापील अवकळा आली होती. ही अवकळा पालटली पाहिजे. गटण्याला खऱ्याखुऱ्या अर्थानं जीवन जगता आले पाहिजे, स्वतःच्या बुद्धीने जीवनाचा अन्वयार्थ लावण्याइतकी त्याला समज आली पाहिजे. स्वतःच्या बुद्धीने जीवनाचा अन्वयार्थ लावण्याइतकी त्याला समज आली पाहिजे असे लेखकाला तीव्रतेने वाटत होते. त्याच्या वडिलांचीही तीच इच्छा होती. पण हे होणार कसं?

जन्मभर अविवाहीत राहण्याच्या आपल्या प्रतिज्ञेच्या आड आपले वडीलच येत आहेत हे पाहून सखारामने लेखकाच्या मध्यस्थीने त्याचे मन वळवून पाहण्याचा विचार केला. पण साक्षीदाराने आयत्या वेळी विरूद्ध बाजूचीच कड घेतलेली पाहून वादीची जी अवस्था होते तिचा यावेळी सखाराम्ला अनुभव आला. आजन्म ब्रह्मचर्य पालनाचा आपला ध्येयवाद लेखकालाही फारसा मंजूर नसल्याचे त्याच्या ध्यानात आले.

वडिलांची प्रबळ इच्छा म्हणून म्हणा अथवा नियतीचा तसा संकेत होता म्हणून म्हणा, गटणेचे पाय जमिनीला लागले. तो माणसात आला! त्याच्या डोळयावरली अवास्तव ध्येयवादाची नशा खाडकन् उतरून तो चारचौघांसारखा बोलू चालू लागला.

सखाराम मार्गी लागल्याचे लेखकाला समाधान झाले. ग्रंथाऐवजी तो जीवनाशी एकनिष्ठ राहू लागल्याचा त्याला एका वर्षाच्या आत पुरावा मिळाला. सखारामच्या वडिलांनी चांदीच्या वाटीतून नातवाचे पेढे त्याला आणून दिले होते.

**'नंदा प्रधान'** या कथेची प्रकृति प्रस्तुत संग्रहांतल्या सर्व लेखांहून अगदी भिन्न आहे. विस्तारानेही ती सर्व लेखापेक्षा थोडी अधिक भरेल. लघुकथेच्या अंगाने नंदा प्रधानच्या आयुष्यातले काही हळूवार क्षण पु.लं.नी तितक्याच हलक्या हाताने, कमालीच्या कलात्मक संयमाने चित्रित केले आहेत.

आई वडिलांच्या छत्राला लहानपणीच पारख्या झालेल्या नंदाच्या आयुष्यात पुढे तरूणपणी अनेक सुंदर सुंदर तरूणी आल्या. त्यांनी त्याच्यावर प्रेम केले पण एकीचेही प्रेम त्याच्या मनात मूळ धरू शकले नाही. त्या आल्या तशा त्याच्या आयुष्यातून निघून गेल्या. याला अपवाद ठरल्या फक्त दोघीजणीच। एक पुण्याची इंदु वेलणकर अन् दुसरी तो परदेशात गेला तेव्हा मनापासून त्याच्यावर प्रेम करणारी जर्मन युवती विल्मा. पण नियतीने एकीलाही प्रीतिसाफल्याचे समाधान अनुभवू दिले नाही. इंदूच्या प्रेमावर निखारे ठेवायला तिचा जन्मदाता बापच कारणीभूत झाला अन् विल्माच्या प्रेमाला तिच्याच देशातल्या शिपायांनी हिटलरच्या दूतांनी निर्घृणपणाने नख लावले.

महायुद्धाच्या खाईत पाश्चात्य देशातल्या नागरिकांचे उध्वस्त झालेले संसार नंदाने पाहिले होते. शहरातल्या उंच उंच हवेल्याबरोबर माणूसकीची मूल्यही धडाधड कोसळत असलेली त्याने पाहिली होती. डोक्यावर तीव्र आघात होऊन मनुष्याचा मेंदु बधीर व्हावा तशा आपल्या साऱ्या संवेदना सुन्न झाल्यासारखे त्याला वाटू लागले. त्याग, प्रेम, पावित्र्य वगैरे मूल्यांचा अर्थ उरला नाही असे त्याला वाटू लागते. तारायंत्राची डमी सारख्याच निर्विकारपणे आनंदाची वार्ता नि शोकसंदेश टिपून घेते तितक्याच अलिप्तपणाने तटस्थ वृत्तीने तो आपल्या आयुष्यातले सुखदु:खाचे क्षण टिपून घेत होता. जीवित प्रेम कीर्ति यांच्याकडे पाहण्याचा नंदाचा दृष्टीकोण कसकसा बदलत गेला नि शेवटी स्थितप्रज्ञाला शोभणाऱ्या निर्भय वृत्तीने तो जीवनाकडे कसा पाहू लागला हे पाहण्यासारखे आहे. वैचारिकते इतकेच वैफल्यही मनुष्याला अनासक्त बनवायला कधी कधी कारणीभूत होत हा विचार प्रस्तुत कथेच्या अनुषंगाने मनात येऊन मोठी गंमत वाटू लागते!

'बोलट' या लेखात एका दुर्दैवी नटाची शोकांतिका पु.लं.नी रेखाटली आहे. सहृदयता आणि उपरोध यांच्या मनोहर मिलापामुळे सदर शोकांतिका विशेष वाचनीय झाली आहे. पन्नास--साठ वर्षापूर्वी वयाच्या सातव्या आठव्या वर्षी नाटक कंपनीत केवळ पोट भरण्याच्या माफक महत्वाकांक्षेने घरातून पळून गेलेल्या नि पुढे नट म्हणून थोडेफार नाव कमावता आलेल्या अनेक नटांचा प्रतिनिधी वाटावा असा हा जनार्दन नारो शिंगणापूरकर पु.लं.नी कौशल्याने आपणांपुढे उभा केला आहे. त्यावेळच्या नटाचा भाबडेपणा, अशिक्षितपणा, व्यसनाधीनता, रंगेल वृत्ति वगैरे साऱ्या गुणावगुणांचे

यथार्थ दर्शन जनार्दन नारोच्या रूपाने आपणाला घडते! हे दर्शन घडविताना लेखकाने उपहास-- उपरोधाच्या अनेक छटा वापरून त्याची वेधकता वाढविली आहे.

"अभिनयाचेच काय, परंतु धूतपापेश्वराचे सुद्धा बाळकडू त्याला मिळाले नाही." "दारिद्रय आणि दु:ख हे भरपूर कडू औषध पीतच जनू घाणेरीच्या रोपासारखा आपोआप वाढला.", 'दरिद्री जिण्यांत संततीची पैदास अधिक असा एक प्राणिशास्त्राचा सिद्धांत आहे म्हणतात. वाङ्मयातसुद्धा नाटयकलेच्या दारिद्रयावस्थेतच असले दुबळे शब्द खूप पैदा झाले", "नाटक कंपनीत ज्याच्या नावाची जाहिरात होते तो नट आणि बाकीचे 'बोलट' ह्या दरिद्री कोटीचा जनक कोण होता कोण जाणे, परंतु जनू हा त्या कोटीचा बळी होता..." वगैरेसारखी चमकदार सुभाषितवजा वाक्ये पु.लं.च्या कल्पनेबरोबरच भाषा प्रभुत्वाचीही उत्तम कल्पना आणून देतात.

नाटक कंपनीत पळून जाण्यापूर्वी आठवडयातून पाच दिवस माधुकरी अन् दोन दिवस दोन घरी वार लावून जनू आयुष्याचा एकेक दिवस मागे टाकीत होता. त्याच्या 'आश्रयदात्या'च्या औदार्याने पु.लं.नी केलेले 'विश्लेषण' त्यांच्या शब्दात वाचायला हवे. माधुकरीला अन् वारांना कंटाळून जनू नाटक कंपनीत पळून गेल्याचा निर्देश केल्यावर ते लिहितात -- (3)

"..... आपल्या घरी रोज माधुकरी मागायला येणारे एक कार्टे तीन चार दिवस आले नाही म्हणून त्याची चौकशी करण्याइतका कुठल्याही गृहदेवतेचा प्रसाद त्याला लाभला नव्हता. दोन दिवस जनूच्या पुण्याईवर आळीतली मिरासदार कुत्री जगली. तिसऱ्या दिवशी सज्जनाघरच्या भाकरीला ती कुत्रीही कंटाळून महारवाडयात हाडे चघळायला निघून गेली. जनूला सोमवार संध्याकाळ आणि शनिवार सकाळ असे दोन वार मिळाले होते. एका घरी सोमवार संध्याकाळचा घरातल्या मंडळींना उपास असल्यामुळे जनूला सकाळी उरलेल्या जेवणाचे दान व्हायचे. त्यातून मालकीणबाई फारच खुश झाल्या तर इकडच्यासाठी केलेल्या लापशीत अर्धा पेला पाणी ओतून जनूला द्यायच्या! 'शनिवार'च्या घरात मंडळी संध्याकाळी जेवत, त्यामुळे त्या घरातली जनूची ढेकरही शुक्रवारच्या शिळया मुळयाच्या भाजीची असे! जनू कंटाळला!'

जनूच्या आईने केलेल्या गृहत्यागासंबंधी पु.लं.नी केलेले भाष्यही असेच खोचक अन् वस्तुस्थितीला धरून उतरले आहे ते म्हणतात --(4)

'एके दिवशी त्याची विधवा आई...दुसऱ्या एकाचा हात धरून पळून गेली. तिच्या गृहत्यागामागे 'व्यक्तिविकास' नव्हता. 'नव्या क्षितीजांचे दिव्य दर्शन नव्हते. दोन वेळचे नियमित जेवण त्या आंतरिक ओढीने संसारातल्या ओढग्रस्तीला विटलेली जनूची मातृदेवता एका विधुर खाणावळवाल्याच्या विरही जीवनाला विरंगुळा देण्यासाठी निघून गेली. तिला जेवण पाहिजे होते. त्याला बायको पाहिजे होती. दोघांनीही एकमेकांना साहाय्य करून आपापले प्रश्न मिटवले. इकडे आई खाणावळीत पळाली आणि चिरंजीव नाटक कंपनीत पळून आले..."

वाढत्या वयाबरोबर जनूने जडवून घेतलेल्या व्यसनांची संख्याही वाढत चालली. त्याच्या छंदीपणाने उत्क्रांतीचा एकेक टप्पा गाठला याचे पु.लं.नी केलेले वर्णनही असेच खुमासदार आहे.

''जनूने विडीकाडीबरोबर इतरही बारीक सारीक व्यसनांची जोड केली. लातूरच्या मुक्कामात कंपनीत भांडी घासायला ठेवलेल्या कोण्या सखू ठकमारीवर प्रेमही केले.

'प्रेमसंन्यासा'तील ऐकून पाठ झालेली जयंताची भाषणही त्याने सखूला म्हणून दाखविली. पहिल्या महायुद्धापूर्वीचा तो काळ. तत्कालीन प्रेम 'परमेश्वर रूप' वगैरे असले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी प्रेमात दूर दूर जाण्याचा भाग आला. तरीसुद्धा जनूने त्या परमेश्वरसाक्षी प्रेमस्वरूप परब्रह्माला घेऊन पलायन करण्याचा प्रयत्न केला. परंतु जनूची परमेश्वर स्वरूपी प्रेयसी परमेश्वरा इतकीच सर्वव्यापी होती. तिला एका जनार्दनाचा विषय होण्यापेक्षा जनताजनार्दनासाठी सर्वस्व अर्पण करणे अधिक रूचले आणि जनूचा प्रेमभंग झाला. जनूला दारू प्यायला कारण सापडले. लातूरचा मुक्काम हलताना एका सखू ठकमारीपायी प्रेमभंग झालेले इतर नऊ 'जयंत' दारू प्यायला लागले. पुढे दारूच्या नशेत हे दहाही लोक आपलया प्रेमभंगाची एकच कहाणी दहादा सांगून आणि ऐकून रडत बसत. त्या नाटक कंपनीत त्या 'दशकुमारा'ची कहाणी हा एक थट्टेचा विषय होऊन बसला होता.''

'भय्या नागपूरकर' चा तोंडवळा 'तुझे आहे तुजपाशी' मधल्या थेट काकाजींच्या चेहऱ्याशी जुळता मिळता आहे. तीच रंगेल वृत्ती वागण्यातला तोच बेदरकारपणा, संगीताविषयीची आसक्ति, मनाचा उमदेपणा, दुसऱ्याच्या दुःखाने कळवळणारा हळुवार स्वभाव... सारे सारे

काकाजींच्या व्यक्तित्वाशी तंतोतंत जुळणारे. दारूच्या षौकात आकंठ बुडूनही माणूसकीला तो पारखा झालेला नसतो. त्याच्या कपाटात दारूच्या बाटल्या अन् रेसची पुस्तक असतात तसा गांधींचा छोटासा पुतळा नि नेहरूंचे ग्रंथही असतात.

आणि त्याची ही गांधी नि नेहरूनिष्ठा नुसती पुस्तकी नसते – तिला कृतीचा भक्कम आधार असतो. कसल्याशा राजकीय गुन्ह्यावरून अटक होऊन तो तुरूंगात जातो.

**'नाथा कामत'** हे प्रणयाने पेटलेल्या धंद झालेल्या एका कलंदर युवकाचे व्यक्तिचित्र आहे. कुणाला राजकारणात पडण्याची हौस असते. कुणी निवडणूकीत पडतात. तर कुणाला तिसऱ्याच्या भांडणात पडण्याची सवय असते. नाथा कामतला सुंदर सुंदर पोरींच्या प्रेमात पडण्याची सवय होती. लावण्यवतींच्या मादक कटाक्षांनी विद्ध होण्यासाठीच जणू विधात्याने हृदय नावाची वस्तु त्याच्या हवाली केली होती. पु.ल. त्याच्या जीवन ध्येयाची, अवतारकार्याची मीमांसा करताना लिहितात – (5)

"नाथा कामत हा अल्लाघरचा मोर होता. सदैव आपला पिसारा फुलवून नित्य नूतन लांडोरींच्या शोधात. त्याला घडवताना विधात्याने रोमिओ, मजनू, फरहाद, हीररांझा ह्या पंजाबी नरमादी पैकी जो कोणी नर असेल तो सोणीमहीवाल मधला वाल किंवा महीवाल आणि क्लिओपात्रा ते कान्होपात्रा ह्या व अशासारख्या हजारो सुंदरींवर जीव ओवाळीत राहणे एवढेच कार्य केलेले जे जे म्हणून परदेशी व एतद्‌देशीय गडी होऊन गेले त्याचे नकाशे संबंधित अधिकाऱ्याकडून मागवले असतील आणि त्यानंतर नाथा कामत नावाचा पदार्थ तो विधाता करिता होऊन चार महिन्यांच्या शेषशयनी जाता झाला असेल."

रस्त्यात अगर कुठेही जाताना एखादी देखणी मुलगी दिसली की, नाथा कामतची अवस्था कशी होते याची कल्पना आणून देताना ते पुढे म्हणतात –(6)

"कुठल्याही शहर वस्तीतल्या रस्त्यांतून नाथा कामत बरोबर चालत जाण्यापेक्षा गोबीच्या वाळवंटातून भर दुपारी अनवाणी धावत जाणे अधिक सुखावह! पातळ लुगडे किंवा स्कर्ट गुंडाळून दृष्टीपथांतून काहीही सरकल्यासारखे झाले की, नाथा कामतचे पंचप्राण डोळयात येऊन गोठतात. गळयातले आदायचे सफरचंद सुतार लोकांकडे लेव्हल मोजायचे यंत्र असते त्यातल्या बुडबुडयासारखे

खालीवर व्हायला लागते – मानेचा कोन उलटा फिरत तीनशेसाठ अंशाचा प्रवास करून येतो. आणि वस्त्रान्वित वस्तु जरा देखण्यांतली निघाली की नाथाच्या बुटाला चाके लावल्यासारखा तो अधांतरी तरंगू लागतो. ह्या तुर्यावस्थेतून सहजभावात यायला काही मिनिटे जावी लागतात..."

पार्ल्यातल्या एकूण एक कुमारिकेचे नाव अन् घर नंबर तोंडपाठ असलेला, त्यांच्या सौदर्याचा तपशील बिनचूकपणे वर्णन करून सांगणारा हा नाथा कामत अनेक पोरींच्या प्रेमात पडला अन् पुन्हा सावरला. पडताना त्याला कधी खरचटल्यासारखे होई तर कधी खोल जखमा होत!

आणि प्रेमभंगाच्या आठवणीने त्याच्या हृदयात येणारे दु:खाचे कढ, कंठात दाटणारे गहिंवर, डोळयांत तरळणारी आसवे अन् नाकावाटे बाहेर पडणारे प्रदीर्घ नि:श्वास.... हे सारे सारे इतिहास जमा होऊन नाथा कामत एके दिवशी अचानकपणे बोहल्यावर चढला अन् मार्गी लागला. सखाराम गटणे लागला अगदी तस्सा! फरक इतकाच की, सखाराम अवास्तव ध्येयवादाच्या मागे मागे धावत होता अन् नाथा कामत नाटक कादंबऱ्यांतून आलेल्या काव्यात्म प्रेमाच्या!

कापड कितीही भारीचे असले तरी त्याचा कोट शिवताना आतून आस्तर लावावेच लागते. तसे ध्येय कितीही उच्च असले किंवा प्रेम कितीही काव्यमय असले तरी त्याची उपयुक्तता सिद्ध व्हायला त्याला व्यवहार्यतेची जोड देणे आवश्यक ठरते हे दोघांनाही उमगुन आले.

प्रेयसीसाठी बाजारात खरेदी केलेल्या सेंटला जे मूल्य आहे तेच तिच्यासाठी खरीदलेल्या साबूदाण्यालाही असू शकते हा नाथा कामतला नवा साक्षात्कार झाला अन् तेव्हापासून दुष्यन्त, पुरूरवा, अनरूिद्ध, पुंडरीक इत्यादी मंडळींप्रमाणे प्रे करू पाहणारा हा 'हिरो' गंपू, धोंडू, तात्या, चिंतू यांच्याप्रमाणेच शुद्ध व्यावहारिक प्रेम करू लागला!

प्रणयाच्या पार्श्वभूमीवर नाथा कामतचे हे व्यक्तिचित्र रेखाटताना खरे म्हणजे कॉलेज कुमारांच्या नि त्यांच्याच अवस्थेतल्या इतरेजनांच्या भोगवासना चाळवायची पु.लं.ना केवढी संधी चालू आली होती! पण ते असे करते तर मग इतर कलमबहाद्दरांत अन् पु.ल. यांच्यात काय अंतर उरले असते? प्रणय झाला तरी तो जीवनाचा एकमेव हेतु नव्हे ही जाणीव ते कधीही दृष्टीआड करू शकत नाहीत; म्हणूनच प्रणयाच्या अवखळ धुंद लीला वर्णन करता करताच ते त्याकडे पाहायला लागणारी विशुद्ध, उदात्त दृष्टीही वाचकांना देऊन जातात!

**'दोन वस्ताद'** यात एका तबलजीच्या नि एका पहिलवानाच्या गतायुष्यांतल्या दोन अविस्मरणीय घटना त्यांच्या तोंडून वदवता वदवता सध्या ते जगत असलेल्या हलाखीच्या जीवनाचे चित्र पु.ल. रेखाटतात अन् त्या दोन भिन्न क्षेत्रांतल्या पुरूषसिंहा विषयी वाचकांच्या मनात आदराबरोबरच असीम करूणाही उत्पन्न करतात.

गजा खोत, अण्णा वडगावकर, परोपकारी गंपू, चितळे मास्तर, लखू रिसबूड, बापू काणे, तो, अंतू बर्वा, हंड्रेड पर्सेंट पेस्तनकाका ही व्यक्तिचित्रणही यानाही त्या कारणाने आपापल्या परीने वैशिष्टयपूर्ण उतरली आहेत. कुणी सरळ स्वभावामुळे, कुणी भाबडेपणामुळे, कुणी परोपकारी वृत्तीमुळे तर कुणी इरसाल, खवचटपणांमुळे ती वाचकांच्या सदैव स्मरणांत राहतील.

अंतू बर्वा ही कोकणच्या मायाळूपणाचा आणि इरसालपणाचा पुरेपूर अर्क उतरलेली व्यक्ती. कोकणच्या वयस्कांप्रमाणेच मनिऑर्डरवर जगणारी. येईल तो क्षण त्यावर मल्लीनाथी करून जगणे हे अंतूचे जीवन. अंतूची भाषाही वेगळी, कायम तिरकी जाणारी आणि मिष्किलपणे भरलेली. साधे चहात दूध कमी आहे हे सुद्धा हा माणूस सरळ न सांगता 'रत्नागिरीच्या समस्त म्हशी तूर्तास गाभण काय रे झंप्या' असे म्हणून तो फुकटचा चहा ढोसणार. बाकी अण्णू गोगटया होणे, तर्जनी--नासिका न्याय, बीबीशीआय ला आय.पी.चा डबा जोडणे हे अंतूचे खास वाक्प्रचार. अशा या अंतूची दीनवाणी पण मिष्किल मूर्ती अंतर्बाह्य सुखद आणि चित्रमय पद्धतीने लेखकाने विलक्षण प्रत्ययकारीपणे रेखाटली आहे. कोणत्याही विषयावर आपल्या मताची पिंक टाकल्याशिवाय या माणसाला स्वस्थ बसवत नाही. तरीही हा माणूस राजकारण, समाजकारण, संगीत, नाटक सर्वापासून अलिप्त आहे. वरून फणसासारख्या खडबडीत पण आतून मायेची गोडी दाखविणाऱ्या या व्यक्तिचित्राचा शेवट हृदयस्पर्शी आहे. ही निवड तशी वादग्रस्तच कारण पक्वांनांनी भरलेल्या ताटात कोणते चांगले हे सांगणे जसे कठीण तशीच स्थिती इथेही होते. कारण सर्वच लेखन पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटावे इतके सुंदर आहे. व्यक्ती साक्षात साकार करण्याचे सर्व गुणधर्म समाविष्ट असणाऱ्या या व्यक्तिचित्रांतून भावनेचा ओलावा, अंतर्यामीचा जिव्हाळा आणि कारूण्याची झालर याचा जो संगम आढळतो तो केवळ अभूतपूर्व आहे. सर्वच व्यक्तिचित्रांमधून दर्जेदार नर्म विनोद व उत्कट कारूण्य

याचा सुंदर समन्वय साधलेला असून कमीत कमी प्रयत्नात व्यक्तिचित्र उभे करण्याचे सामर्थ्य सर्वच लेखनात आढळते.

**'चितळे मास्तरांचे'** चित्रमय वर्णन आहे. ''डाव्या हातात धोतर एके काळी निळया रंगाचा असावा अशी शंका उत्पन्न करणारा खादीचा डगला, डोक्याला इशान्य–नैऋत्य दाखविणारी काळी टोपी, टोपीबाहेर टकलाच्या आसपास टिकून राहिलेले केस आले आहेत. नाक आणि मिशांची ठेवण राम गणेश गडकऱ्यांसारखी, पायातल्या वहाणा आदल्या दिवशी शाळेत विसरून गेले नसले तर पायात आहेत, डावा हात धोतराचा सोगा पकडण्यात गुंतलेला असल्यामुळे उजव्या हातातली पुस्तके उजव्या खांद्यावर धरलेली आणि हातात पुस्तके नसल्यास उजव्या हाताची तर्जनी खांद्याच्या बाजूला आपण एक हा आकडा दाखवताना नाचवतो तशी नाचवीत चितळे मास्तरांनी स्वतःच्या घरापासून शाळेपर्यंतचा तो लांबसडक रस्ता गेली तीस वर्षे तुडवला.''

**'लखू रिसबूड'** बुद्धीजीवि म्हणविणाऱ्या वर्गाचा, साहित्यात क्रांती करून सोडण्याची ऊठसूट प्रतिज्ञा करणाऱ्या अहंमन्य, अप्रामाणिक, वाचीवीराचा प्रातिनिधिक नमुना म्हणून वाचकांच्या नित्य आठवणीत राहील. जगात जे जे महान चिरस्मरणीय, मंगल म्हणून समजले गेले आहे ते ते सारे क्षुद्र, तिरस्करणीय – अतएव त्याज्य आहे असे मानणारा एक पंथ महाराष्ट्रात नुकताच उदयाला येऊ पाहात आहे. त्या पंथाचा आद्य प्रवर्तक शोभावा अशी लखू रिसबूडची योग्यता! साऱ्या जगाला मुर्खात काढायला निघालेल्या या संप्रदायाच्या बुद्धीवादाचा, पुरोगामित्वाचा अन् क्रांतीकारित्वाचा बुरखा फाडून त्याचे अस्सल स्वरूप निदर्शनास आणून देणारा 'लखू रिसबूड' हा लेख त्या संप्रदायाची दीक्षा घेऊ पाहणाऱ्या तमाम शिष्य मंडळींनी एकवार तरी आवश्य नजरेखालून घालावा!

**'ते चौकोनी कुटुंब'** मध्ये संसाराला छापील ग्रंथाची कळा आणू पाहणारे मालतीबाई माधवराव हे दांपत्यही वाचकांची चांगलीच करमणूक करते. खेळण्याच्या दुकानात काचेच्या कपाटात बाहुलाबाहुलीचा सुंदर संसार मांडून ठेवला असावा तसा मालतीबाई माधवरावांच्या प्रपंचाचा मांड मांडलेला असतो. तसाच रेखीव सुंदर अन् टापटिपीचा. पण हे साम्य इथेच संपत नाही. कपाटातल्या संसाराप्रमाणे इथेही भावनांचा, चैतन्याचा अभाव असल्याचे जाणवते. कळीच्या बाहुलीच्या हालचाली वेधक वाटल्या तरी त्यात जिवंतपणा नसतो. ग्रंथातल्या उपदेशाच्या कळीबर हुकूम चालणारा माधवरावांचा संसारही असाच आकर्षक पण चैतन्यहीन निर्जिव वाटतो. यात त्या कुटुंबाच्या

युनिटला व्यक्तिमत्व देऊन त्याचे व्यक्तिचित्र लिहिले आहे.

**व्यक्ती आणि वल्ली : रंगरूप :–**

'व्यक्ती आणि वल्ली' चे रंगरूप हे अशा प्रकारचे आहे. भिन्नभिन्न स्वभावाच्या, प्रकृतिधर्माच्या ह्या माणसांच्या अंतरंगाचा जसजसा परिचय होऊ लागतो तसतसे त्याच्यातल्या फरका बरोबरच एक ठळक साम्यही लक्षात आल्याशिवाय राहत नाही. या वेगवेगळया मनोधर्माच्या व्यक्तीतला माणूसकीचा समानधर्म पु.लं.ना विलोभनीय वाटून ते त्यांच्याविषयी लिहायला उद्युक्त झाले हे 'व्यक्ती आणि वल्ली' वाचीत असताना सारखे मनाला जाणवत असते.

या मुद्दयाच्या संदर्भात कदाचित कुणाला असाही प्रश्न सुचण्याची शक्यता आहे – पु.लं.ना दिसल्या तशा व्यक्ती जगात असतीलही, पण निखालस दुष्ट, केवळ विषयलंपट, बेइमान, कृतघ्न, क्रूर अशीही माणसे या जगात काही थोडीथोडकी नाहीत। त्याचे चित्रण पु.लं.नी करण्याचे का टाळावे? असा प्रश्न करणाऱ्यांनी दोन चुकीचे सिद्धांत मनाशी बांधलेले असतात ते हे की साहित्यात उदात्त, भव्य, दिव्य यांच्या बरोबरीनेच क्षुद्र, अमंगल असते, याचेही चित्रण झाले तरच त्याला परिपूर्णता येते, लेखनाचे सार्थक होते आणि कादंबरी नाटकाप्रमाणेच इतर लेखन प्रकारांतही लेखकाने तटस्थेच्या, अलिप्तपणाच्या भूमिकेवरून व्यक्तिरेखन करावे.

कादंबरी नाटकाच्या संदर्भात वरील सारखा प्रश्न उपस्थित करणे अप्रस्तुत ठरणार नाही. पण व्यक्तिचित्रणासारख्या इतर लेखनप्रकाराच्या बाबतीतही लेखकाकडून हीच अपेक्षा बाळगायला लागलो तर ते त्याला अन्याय करणारे होणार आहे. व्यक्तिचित्रण हा मुळी अलिप्तपणाने लिहिण्याचा प्रकारच नव्हे! लेखकाला ज्याचे व्यक्तिमत्व विलोभनीय वाटते, ज्यांच्या गुणांनी तो प्रभावित होतो तोच त्याच्या चित्रणाचा विषय होतो. अशा व्यक्तींविषयी जिव्हाळयाने, तादात्म्याने त्याला लिहावेसे वाटू लागते.

----------

## – संदर्भ टीपा –

1. 'व्यक्ति आणि वल्ली' पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), चौदावी आवृत्ती, पृ. प्रस्तावना.

2. 'व्यक्ति आणि वल्ली', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), चौदावी आवृत्ती, पृ. 18

3. 'व्यक्ति आणि वल्ली', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), चौदावी आवृत्ती, पृ. 63

4. 'व्यक्ति आणि वल्ली', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), चौदावी आवृत्ती, पृ. 63

5. 'व्यक्ति आणि वल्ली', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), चौदावी आवृत्ती, पृ. 75

6. 'व्यक्ति आणि वल्ली', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), चौदावी आवृत्ती, पृ. 76

----------